राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांव्दारे आरोग्य तपासणी केलेल्या मुलांच्या शस्त्रक्रियांसाठी व दुर्धर आजारावरील उपचारांसाठी राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या सहयोगाने अंगीकृत रुग्णालयांव्दारे सेवा उपलब्ध करुन देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक आरोग्य विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः क्र.सा.आ.वि.३००११/प्र.क्र. १२६/२०१६/आ.७**

जी. टी रुग्णालय आवार, १० वा मजला,

मंत्रालय मुंबई- ४००००१.

दिनांक : २१ डिसेंबर, २०१७

**वाचा :-**

१) शासन निर्णय क्रमांकः दाकुआ २०१०/प्र.क्र. ७७/१०, आरोग्य -६, दिनांक ५ मे, २०१०.

२) शासन निर्णय क्रमांकः रागांयो २०१०/प्र.क्र. २४०/ आरोग्य-६, दिनांक -३१ मे, २०११.

३) आयुक्त कु.क. तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान यांचे क्र. राआसो / आरसीएच-१ / राबास्वाका/ शासन निर्णय / ६७७२९, दिनांक २१ जानेवारी, २०१६ चे पत्र.

४) आयुक्त , आरोग्य सेवा व अभियान संचालक, रा. आ. अ. यांचे जा.क्र. रा.आ.सो. / आरसीएच / आरबीएसके शस्त्रक्रीया / ४६६७ /१७ दिनांक १७ एप्रिल, २०१७ चे पत्र .

५) मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, मुंबई यांचे क्र. रा.आ.ह.सो. / मेडीकल ऑडीट / २२७२ /शासन निर्णय / १०३८ /२०१७ दिनांक १८ ऑगस्ट, २०१७ चे पत्र.

६) शासन निर्णय क्रमांकः क्र. सा.आ.वि. ३००१००/ प्र.क्र. १२६/२०१६/आ-७, दिनांक ३ मार्च, २०१६

राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांव्दारे आरोग्य तपासणी केलेल्या मुलांच्या शस्त्रक्रियांसाठी व दुर्धर आजारावरील उपचारांसाठी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सोसायटीच्या सहयोगाने अंगीकृत रुग्णालयांव्दारे सेवा उपलब्ध करुन देण्याबाबतचा शासन निर्णय, दिनांक ३ मार्च, २०१६ रोजी उपरोक्त वाचा मध्ये नमुद केलेल्या क्रमांक ६ अन्वये निर्गमित करण्यात आला होता. तथापि, सदर शासन निर्णयाच्या अंमलबजावणीमध्ये अडचणी येत असल्यामुळे व सदर शासन निर्णयात सुधारणा करण्याबाबत आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान

संचालक, रा. आ. अ., मुंबई व मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, मुंबई यांनी शासनास विनंती केल्यामुळे उपरोक्त वाचा मध्ये क्रमांक. ६ अन्वये निर्गमित केलेला शासन निर्णय रद्द करून सुधारीत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

त्यानुसार दिनांक ३ मार्च, २०१६ रोजी निर्गमित केलेला शासन निर्णय या शासन निर्णयाद्वारे रद्द करण्यात येत असून पुढील प्रमाणे सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**प्रस्तावना :-**

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यान्वित असलेल्या राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमामध्ये ० ते १८ वर्ष वयोगटातील मुलांची वैद्यकीय तपासणी करण्यात येऊन मुलांमध्ये आढळणारे आजार, जन्मत: असलेले व्यंग, जीवनसत्वांच्या कमतरतेमुळे होणारे आजार इत्यादी बाबींचे वेळेवर निदान करुन त्यांच्यावर योग्य उपचार करण्याबाबत कार्यवाही करण्यात येते. राज्यात यासाठी तालुका स्तरावर तपासणी पथकांची स्थापना करण्यात आली असुन प्रत्येक पथकामध्ये दोन वैद्यकीय अधिकारी, एक औषध निर्माता व एक परिचारीका यांचा समावेश आहे. तपासणी पथके कार्यक्षेत्रातील अंगणवाडी व शाळा यांना भेटी देतात व तेथील मुलांची तपासणी करतात. राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाच्या माध्यमातून ० - १८ वर्ष वयोगटातील मुलांनी ४ Ds म्हणजे जन्मत: व्यंग (Defect), जीवनसत्व कमतरतेने होणारे आजार (Deficiencies), शारिरीक व मानसिक विकासात्मक विलंब (Developmental Delays) आणि आजार (Diseases) या संदर्भात निदान व उपचार देण्यात येतात. या कार्यक्रमा अंतर्गत अंगणवाडी स्तरावरील ० - ६ वर्ष वयोगटातील सर्व मुले तसेच प्रसुती निकष (Delivery Point) पुर्ण करणाऱ्या आरोग्य संस्थांमधील व आशा स्वंयसेविकेच्या मदतीने झालेल्या गृह प्रसुतीमधील मुले, शासकीय व निमशासकीय शाळेतील/कनिष्ठ महाविद्यालयातील तसेच, आश्रम शाळांमधील ६ ते १८ वयोगटातील मुलांवर सर्व प्रकारचे वैद्यकीय उपचार व गंभीर आजारांवर शल्यचिकित्सा / शस्त्रक्रिया करणे अभिप्रेत आहे. याबाबतच्या तपासणीमधून मुलांना आवश्यकतेनुसार वरिष्ठ रुग्णालयात संदर्भित करण्यात येते व उपचार अथवा शस्त्रक्रिया करण्यात येते. राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत मुलांच्या आरोग्य तपासणीअंती Screening करुन निदान केलेल्या व दुर्धर आजार असलेल्या तसेच, केंद्र शासनाने निश्चित करुन दिलेल्या १०४ प्रकारच्या शस्त्रक्रिया करणे आवश्यक असलेल्या मुलांना संदर्भ सेवेव्दारे तातडीने पुढील सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी राज्यामध्ये कार्यान्वित असलेल्या राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांव्दारे ० - १८ वर्ष वयोगटातील आरोग्य तपासणी केलेल्या मुलांच्या शस्त्रक्रियासाठी व दुर्धर आजारावरील उपचारांसाठी राज्य आरोग्य हमी

सोसायटीच्या सहयोगाने Assurance mode वर ( विमा कंपनीचा सहभाग न घेता ) अंगीकृत रुग्णालयांव्दारे सेवा उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :-

राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाच्या माध्यमातून ० ते १८ वयोगटातील आरोग्य तपासणी केलेल्या मुलांवर शस्त्रक्रिया करण्यासाठी व त्यांच्या दुर्धर आजारावरील उपचारांसाठी राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या अंगिकृत रुग्णालयांद्वारे सेवा उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात येत आहे. या संदर्भात पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

१. **लाभार्थी मुलांची ओळख :-** राज्यातील अशा सर्व ० ते १८ वर्ष वयोगटातील मुलांची वर्षातून दोन वेळा आरोग्य तपासणी करुन संदर्भ सेवेसाठी निश्चित करण्यात आलेल्या यादीतील मुलांच्या नावे विहीत प्रपत्रातील संदर्भचिठ्ठी (सोबतच्या **परिशिष्ट “अ”** मध्ये दिलेल्या नमुन्यानुसार) जिल्हा/ स्त्री/ उपजिल्हा/ ग्रामीण रुग्णालय व DEIC कक्षामधील विशेषतज्ञांच्या स्वाक्षरीसह तयार ठेवण्यात यावी. या संदर्भ चिठ्ठीच्या आधारे Pre Authorization तयार करण्यात आलेल्या प्रस्तावावरील लाभार्थी मुले, राज्य आरोग्य हमी सोसायटीने निश्चित केलेल्या निकषाआधारे अंगीकृत खाजगी रुग्णालये / विश्वस्त रुग्णालये व शासकीय रुग्णालयामधून शस्त्रक्रिया व योग्य ते उपचार करुन घेण्यास पात्र ठरतील. यासाठी राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाच्या प्राधिकृत अधिकाऱ्याने दिलेल्या संदर्भ चिठ्ठीसह ० ते ६ वर्ष वयोगटातील बालकांचा त्यांच्या पालकांसह काढलेला फोटो व ६ ते १८ वर्ष वयोगटातील मुलांचा फोटो हे दोन अभिलेख बंधनकारक राहतील. या प्रक्रियेद्वारे लाभार्थ्याचा Unique Identification Number काढण्यात यावा.

२. **खर्चाची मर्यादा:-** सदर योजनेअंतर्गत लाभार्थी मुलांना, केंद्र शासनाने राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाअंतर्गत १०४ प्रकारच्या शस्त्रक्रियेसाठी लाभार्थी मुलांवरील उपचाराकरीता राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत अंगीकृत रुग्णालयांना राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाने निश्चीत केलेल्या सोबतच्या **परिशिष्ट “ब”** मध्ये दर्शविलेल्या वित्तीय मर्यादेत पॅकेज खर्च अनुज्ञेय राहील. सदर योजनेअंतर्गत नमुद केलेल्या प्रोसिजर्सचे संपुर्ण उपचार व आवश्यकतेनुसार पाठपुरावा सेवा नि:शुल्क असतील.

३. **आर्थिक तरतूद :-** या योजनेवरील खर्चाची अर्थसंकल्पीय प्रतिपूर्ती राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यातील राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाअंतर्गत (FMR Code-A.५.२) मधील मंजूर निधीतून केली जाईल.

**४. केंद्र शासनाने शस्त्रक्रिया निहाय निश्चित केलेल्या दरात पुढीलबाबीवरील खर्चाचा देखील समावेश राहील :-**

(अ) केंद्र शासनाने शस्त्रक्रिया निहाय निश्चित केलेल्या शस्त्रक्रियापुर्व व शस्त्रक्रिया पश्चात निदानात्मक व पाठपुरावा सेवा.

(ब) प्रत्यक्ष शस्त्रक्रिया व त्या अनुषंगाने द्यावयाची औषधे, Consumable Supply, disposables.

(क) आंतररुग्ण असतांना संदर्भित लाभार्थ्यास नाश्ता व दोन वेळचे जेवण.

(ड) रुग्णालयातून सुट्टी मिळाल्यावर संदर्भित लाभार्थ्यास आवश्यकतेनुसार पाठपुरावा सेवा देणे.

(इ) राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या १०२ या Referral Transport व्दारे/शासकीय रुग्णालयातील रुग्णवाहिकेद्वारे / राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत पुरवलेल्या वाहनाद्वारे शस्त्रक्रियेसाठी संदर्भित लाभार्थ्यांची विनामुल्य ने-आण करण्यात येईल. रुग्णालय जर महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेमध्ये मान्यताप्राप्त असेल, लाभार्थी महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेमध्ये अंतर्भूत असेल व उपचार महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेमध्ये समाविष्ट असेल तर परतीच्या प्रवासाचे भाडे रुग्णालयाकडून अदा केले जाईल.

**५. निधी वितरणाची कार्यपध्दती व लेखा परिक्षण याबाबत पुढील प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल :-**

(अ) राज्य आरोग्य सोसायटीकडून राज्य आरोग्य हमी सोसायटीस सोबतच्या **परिशिष्ट "ब"** मधील १०४ प्रोसिजर्स अंतर्गत होणाऱ्या शस्त्रक्रिया व उपचारावरील खर्चाच्या प्रदानासाठी निधी सुपूर्द केला जाईल.

(ब) राज्य आरोग्य सोसायटीकडून प्राप्त झालेल्या निधीतून झालेल्या खर्चाचे विवरणपत्र (Statement of Expenditure) व उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) दर ३ महिन्यास राज्य आरोग्य हमी सोसायटीने सादर करून राज्य आरोग्य सोसायटी मार्फत प्रमाणित करुन सादर करणे बंधनकारक राहील.

(क) राज्य आरोग्य सोसायटीकडून प्राप्त होणाऱ्या निधीसाठी राज्य आरोग्य हमी सोसायटीने राष्ट्रीयकृत बँकेचे स्वतंत्र खाते (Current Account) उघडणे आवश्यक राहील, जेणेकरुन राज्य आरोग्य हमी सोसायटी कडे प्राप्त निधी व खर्चाचा ताळमेळ दरमहा करणे शक्य होईल. अंगीकृत शासकीय रुग्णालयाकडे राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम या योजनेअतंर्गत दिल्या जाणाऱ्या उपचार

खर्चाच्या दाव्यापोटी जमा होणाऱ्या रक्कमेकरीता राष्ट्रीयकृत बँकेचे स्वतंत्र खाते व लेखा ठेवणे आवश्यक राहील.

(ड) राज्य आरोग्य हमी सोसायटीस प्राप्त निधितून झालेल्या खर्चाचे अभिलेख राज्य आरोग्य हमी सोसायटीकडे जतन केले जाईल. केलेल्या खर्चाचे राज्य आरोग्य सोसायटीकडून नियुक्त केलेल्या वैधानिक लेखा परिक्षकांमार्फत वार्षिक लेखा परीक्षण केले जाईल.

(इ) राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्य आरोग्य सोसायटीकडून प्राप्त होणारे अनुदान केवळ राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत होणाऱ्या १०४ प्रोसिजर्सखाली होणाऱ्या शस्त्रक्रिया व उपचार या बाबीसाठी खर्च केले जाईल. तसेच योजनेसाठी लागणारा आवर्ती खर्च (प्री ऑथ व दावे अदा करण्यासाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या डॉक्टरांचे वेतन किवा मानधन तसेच कंत्राटी पद्धतीवर नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन, कार्यालयीन खर्च, प्रशासकीय खर्च इत्यादी) व अनावर्ती खर्च (संगणक, लॅपटॉप व इतर हार्ड वेअरची खरेदी इत्यादी) या अनुदानातून अनुज्ञेय राहील.

**६. सदर योजनेच्या अंमलबजावणी करताना अपवादात्मक परिस्थितीमध्ये उद्भवलेल्या बाबींमध्ये तसेच आर्थिक बाबीबाबत निर्णय घेण्यासाठी तसेच आवश्यकता भासल्यास काही प्रोसिजर्सच्या संख्येत व वर्णनात तज्ञांच्या अभिप्रायानुसार बदल करण्याचे अधिकार खालील समितीस असतील. त्यासाठी पुढीलप्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे :-**

| | |
|---|---|
| अ) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान | - अध्यक्ष |
| ब) मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी | - सदस्य |
| क) अतिरीक्त संचालक, कुटूंब कल्याण व माताबाल संगोपन, पुणे | - सदस्य |
| ड) सहसंचालक (तांत्रिक) राष्ट्रीय आरोग्य अभियान | - सदस्य |
| इ) सहसंचालक ( वित्त व लेखा) राष्ट्रीय आरोग्य अभियान | - सदस्य |
| फ) वित्तीय सल्लागार तथा उपसंचालक, राज्य आरोग्य हमी सोसायटी | - सदस्य |
| उ) सहाय्यक संचालक, राज्य आरोग्य हमी सोसायटी | - सदस्य सचिव |

सदर समितीची बैठक आवश्यकतेनुसार आयोजित करण्यात येईल. या बैठकीमध्ये योजनेवर झालेल्या खर्चाचा ताळमेळ घालुन केंद्र शासनाकडून पुरवणी मागणी करणे किवा नुतन वर्षाच्या प्रकल्प अंमलबजावणी आराखड्यामध्ये निधीची मागणी करणे याबाबत निर्णय घेतला जाईल. तसेच, योजनेच्या दर वर्षाच्या लेखा तपासणी अहवालावर या बैठकीमध्ये चर्चा होईल. अपवादात्मक परिस्थितीमध्ये उद्भवलेल्या बाबीसाठी समितीने शिफारस केलेल्या लाभार्थीची नोंदणी संगणक प्रणालीमध्ये करण्यात येईल.

७. महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमातील लाभार्थी मुलांना गुणवत्तापुर्ण वैद्यकीय उपचार नि:शुल्क आणि विनासायास मिळण्यासाठी शासनाने सुरु केलेली ही महत्वाकांक्षी योजना असल्याने या योजनेमधुन संदर्भ सेवा देणे अपेक्षित असलेल्या मुलांना व त्यांचे कुटुंबियांना याबाबतच्या कार्यपध्दतीची माहिती देण्याची तसेच या योजनेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे व फोटो संकलन करणे, शस्त्रक्रियेचा पाठपुरावा करणे ही कार्यवाही अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा RBSK समन्वयक व त्यांच्या अधिनस्थ पथकाद्वारे करण्यात येईल. जिल्हा स्तरावर याची जबाबदारी जिल्हा शल्य चिकित्सक यांची राहील. तथापि यासाठी येणारा खर्च राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत उपलब्ध निधीमधून करण्यात येईल. Pre Authorization व दाव्यांची अदायगी बाबतची जबाबदारी राज्य आरोग्य हमी सोसायटीकडील डॉक्टरांनी पार पाडायची असुन जिल्हा शल्य चिकित्सकांच्याव्दारे राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम पथकातील वैद्यकीय अधिकारी यासाठी लाभार्थी मुलांना नियमितपणे Pre Authorization प्राप्त होण्याच्या अनुषंगाने समन्वयकांची भूमिका निभावतील. लाभार्थ्यांचे उपचार महात्मा फुले जन आरोग्य योजनेत समाविष्ट असतील तर योजनेचे जिल्हा समन्वयक रुग्णाच्या इच्छेनुसार जवळच्या मान्यताप्राप्त रुग्णालयातून Pre Authorization साठी मदत करतील व त्याचा पाठपुरावा करतील.

८. **प्रशिक्षण व प्रचार व प्रसिद्धी ( I.E.C) :** - या योजनेच्या संगणक प्रणाली बाबत व इतर बाबीचे प्रशिक्षण देण्याची जबाबदारी अतिरीक्त संचालक, कुटूंब कल्याण व माताबाल संगोपन, पुणे यांची राहील. प्रशिक्षण द्यावयाच्या कर्मचाऱ्यामध्ये वैद्यकीय अधिकारी, औषध निर्माता, सहाय्यक परिसेविका, प्रसविका, अंगणवाडी सेविका, अंगीकृत रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी यांचा समावेश राहील

**९. रुग्णालय अंगीकरण :-** रुग्णालय अंगीकृत करताना जिल्हा शल्यचिकित्सक यांचे प्रतिनिधी व राज्य आरोग्य हमी सोसायटीचे जिल्हा समन्वयक रुग्णालयाचे ऑडीट करतील. रुग्णालय अंगीकृत झाल्यावर त्रिसदस्यीय समिती मार्फत करावयाच्या करारनाम्यावर अभियान संचालक यांच्या वतीने अतिरिक्त संचालक, कुटुंब कल्याण व माता बाल संगोपन, मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी व रुग्णालय प्रमुख यांच्या स्वाक्षरी असतील.

रुग्णालय अंगीकरण, शिस्तपालन व दावे अपील समिती खालीलप्रमाणे राहीज :-

अ) मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी - अध्यक्ष

ब) उप मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी - सदस्य

क) अतिरीक्त संचालक, कुटूंब कल्याण व माताबाल संगोपन, पुणे -सदस्य
ड) सहसंचालक (तांत्रिक) राष्ट्रीय आरोग्य अभियान - सदस्य
इ) सहसंचालक रुग्णालये ( राज्यस्तर ), मुंबई - सदस्य
फ) मुख्य वैद्यकीय सल्लागार, राज्य आरोग्य हमी सोसायटी - सदस्य
फ) सहाय्यक संचालक, राज्य आरोग्य हमी सोसायटी - सदस्य सचिव

ही समिती रुग्णालय अंगीकरण करण्याचा निर्णय घेण्याची जबाबदारी पार पाडेल. या समितीची बैठक महिन्यातून एकदा होईल.

**१०. सनियंत्रण व तक्रार निवारण समिति** :- योजनेबाबत तसेच रूग्णालयाबाबत सनियंत्रण व तक्रार निवारण करण्यासाठी खालील समित्या कार्यरत असतील -

**I) राज्य स्तरावर सनियंत्रण व तक्रार निवारण समिती :-**

अ) मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी - अध्यक्ष
ब) उप मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी - सदस्य
क) अतिरीक्त संचालक, कुटूंब कल्याण व माताबाल संगोपन - सदस्य
ड) सहसंचालक (तांत्रिक), राष्ट्रीय आरोग्य अभियान - सदस्य
इ)सहसंचालकरुग्णालये ( राज्यस्तर ), मुंबई - सदस्य
फ) मुख्य वैद्यकीय सल्लागार, राज्य आरोग्य हमी सोसायटी - सदस्य
ग) सहाय्यक संचालक, राज्य आरोग्य हमी सोसायटी - सदस्य सचिव

ही समिती रुग्णालयाच्या दाव्याच्या अपिलाबाबत निर्णय घेण्याची जबाबदारी पार पाडेल व आवश्यकता भासल्यास १०४ प्रोसिजर्स मधील काही प्रोसिजर्स शासकीय रुग्णालयासाठी राखीव ठेवण्याचे अधिकार या समितीस असतील. या समितीची बैठक महिन्यातून एकदा होईल.

**II) जिल्हा सनियंत्रण व तक्रार निवारण समिती -**

अ) जिल्हाधिकारी - अध्यक्ष
ब) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद - सह अध्यक्ष
क) जिल्ह्यातील शासकीय व खाजगी वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता - सदस्य
ड) जिल्हा आरोग्य अधिकारी - सदस्य
इ) जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी - सदस्य
फ)जिल्हा समन्वयक, राज्य आरोग्य हमी सोसायटी - सदस्य

ग)राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम जिल्हा समन्वयक - सदस्य
ज) जिल्हा शल्यचिकित्सक - सदस्य सचिव

या समितीची बैठक महिन्यातून एकदा होईल.

११. राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमातील संदर्भ सेवा पुरविणे अपेक्षित असलेल्या लाभार्थी मुलांना महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेतील अंगीकृत रुग्णालयातून सेवा उपलब्ध करुन द्यावयाच्या उपक्रमाची अंमलबजावणी व सनियंत्रण करण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेसाठी विकसित केलेल्या सॉप्टवेअर मध्ये योग्य ते बदल करून Software Source Code वापरण्यास परवानगी देण्यात येत आहे.

१२. राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमातील राज्य आरोग्य हमी सोसायटीकडे सोपविण्यात येणाऱ्या रुग्णाची नोंदणी, प्री ऑथ प्रक्रीया, रुग्णालयास करावयाचे प्रदान याबाबतची कार्यवाही संगणक प्रणालीव्दारे होण्यासाठी लागणारा कालावधी विचारात घेऊन दरम्यानच्या कालावधीत योजनेची संवेदनशीलता लक्षात घेता मॅन्युअल पध्दतीने सदर कार्यवाही करण्यात येईल. याबाबतची कार्यपध्दती सोबत जोडलेल्या **परिशिष्ट “अ”** प्रमाणे राहील.

१३. राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या आरोग्य सल्ला व संपर्क केंद्राची १०४ ही हेल्पलाईन सदर योजनेतंर्गत तक्रार निवारणाकरीता कार्यान्वित राहील. या तक्रारीची माहिती राज्य आरोग्य हमी सोसायटीला पाठवण्यात येईल. तक्रार निवारण राज्य आरोग्य हमी सोसायटीमार्फत करण्यात येईल. तक्रारी राज्य आरोग्य हमी सोसायटीला प्राप्त होण्यासाठी १०४ च्या व योजनेच्या संगणक प्रणाली मध्ये आवश्यक ते बदल करण्याची परवानगी देण्यात येत आहे. सदर प्रस्तावामुळे शासनावर कोणताही अतिरीक्त आर्थिक भार येणार नाही.

१४. जर एखादा लाभार्थी महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेतील फायदे मिळण्यास पात्र असेल व सदर योजनेच्या अंगीकृत रूग्णालयातून सेवा मिळण्यासही पात्र असेल तर सदर लाभार्थ्यावर केलेल्या उपचाराकरीता महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत निश्चित केलेला खर्च अनुज्ञेय राहील. सदर लाभार्थ्यास राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत खर्च अनुज्ञेय असणार नाही.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेताक २०१७१२२०१६२८२५२५१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pandit Jadhav

Digitally signed by Pandit Jadhav
DN: CN = Pandit Jadhav, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2017.12.21 12:37:16 +05'30'

(पं.खं. जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, महाराष्ट्र शासन
२) मा. राज्यमंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, महाराष्ट्र शासन
३) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
५) संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
६) अतिरीक्त संचालक, कुटूंब कल्याण कार्यालय, पुणे.
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, मुंबई.
८) सर्व उपसंचालक, आरोग्य सेवा मंडळे.

**शासन निर्णय क्रमांकः सा.आ.वि.३००११/प्र.क्र.१२६/२०१६/आ-७,** दिनांक २१ डिसेंबर, २०१७

सोबतचे परिशिष्ट “अ”

RBSK Referral Note/Card for **SHAS**

| |
|---|
| Affix the Photo of Beneficiary<br>*Age <6 yrs. - Beneficiary with both or either of parents<br>Age > 6 yrs. - Beneficiary only |

Name of Beneficiary________________________________________

DOB (dd/mm/yyyy)_______________ Age _____Yrs_____ mths

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | |

Gender __ _____

Aadhaar No: ____________________________________________

Name of Parent / Guardian

________________________________________________________

Address_________________________________________________

________________________________________________________

_________________________________________________

Contact No. of Parent/Guardian___________________________________

Name of AWC / School & Address ________________________________

-----------------------------------------------------------------------------------

Name of AWC / School Head & Contact No___________________________

_________________________________________________________

Referred from (RH/SDH/DH/GH/DEIC) ____________________________

Referred to__________________________________________________

Ht (in cms.)________________ Wt (in kgs)_________________

Hb(gm%)_____________

Clinical Notes –

__________________________________________________________

__________________________________________________________

__________________________________________________________

______________________________________________________

Investigations Done –

_______________________________________________________

__________________________________________________________

__________________________________________________________

__________________________________________________________

_________________________________________________________

Provisional Diagnosis –

___________________________________________________

Surgery Code –

_______________________________________________________

Remarks- -

______________________________________________________
______________________________________________________
______________________________________________________
______________________________________________________

Documents Attached -

__________________________________________________
______________________________________________________
______________________________________________________
_____________________________________________________
______________________________________________________

Name of Doctor referring the patient:

Sign of the Doctor

Date :

**शासन निर्णय क्रमांकः- सा.आ.वि.३००११/प्र.क्र.१२६/२०१६/आ-७, दिनांक २१ डिसेंबर, २०१७ सोबतचे परिशिष्ठ ”ब”**

**CODES OF RBSK SURGERIES FOR SHAS**

| Sr. No. | Name of Specialty | Health Condition | Disease | surgical Procedure | Icd -9 Procedure Code | SHAS Code | RBSK Procedure Code | RBSK Model costing (Rs.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Neurosurgery | Neural tube defects | Spina Bifida | Spina Bifida Surgery | 2.1 (cerebral) / 3.5 (spinal) | NSB01 | 1 | 35,000 |
| 2 | Neurosurgery | Neural tube defects | Spina Bifida | Ventriculo-peritoneal shunt for hydrocephalus | 2.34 | NSB02 | 2 | 20,000 |
| 3 | Plastic surgery | Cleft lip and Cleft palate | Cleft lip | Repair of Cleft lip | 27.54 | PLP01 | 3 | 15,000 |
| 4 | Plastic surgery | Cleft lip and Cleft palate | Cleft palate | Correction of Cleft palate | 27.62 | PLP02 | 4 | 18,000 |
| 5 | Orthopedic | Talipes (club foot) | Talipes | CTEV correction - Casting (UL) | 83.84 | OTT01 | 5 | 1,250 |
| 6 | Orthopedic | Talipes (club foot) | Talipes | CTEV correction - Casting (BL) | 83.84 | OTT02 | 6 | 2,500 |
| 7 | Orthopedic | Talipes (club foot) | Talipes | CTEV correction - Tenotomy (UL) | 83.84 | OTT03 | 7 | 1,000 |
| 8 | Orthopedic | Talipes (club foot) | Talipes | CTEV correction - Tenotomy (BL) | 83.84 | OTT04 | 8 | 1,500 |
| 9 | Orthopedic | Talipes (club foot) | Talipes | CTEV correction - Bracing | 83.84 | OTT05 | 9 | 2,000 |
| 10 | Orthopedic | Talipes (club foot) | Talipes | CTEV correction - Ponseti (Total) | 83.84 | OTT06 | 10 | 8,000 (maximum) |
| 11 | Orthopedic | Developmental Dysplasia of the Hip (DDH) | DDH | Pavlik Harness | 93.5 | ODDH01 | 11 | 1,000 |
| 12 | Orthopedic | Developmental Dysplasia of the Hip (DDH) | DDH | Closed reduction and Hip spica | 79.7 & 93.5 | ODDH02 | 12 | 15,000 |
| 13 | Orthopedic | Developmental Dysplasia of the Hip (DDH) | DDH | Open reduction and Hip spica | 79.8 & 93.5 | ODDH03 | 13 | 30,000 |
| 14 | Orthopedic | Developmental Dysplasia of the Hip (DDH) | DDH | Open reduction with Femoral Osteotomy | 79.8 & 86.89 | ODDH04 | 14 | 45,000 |
| 15 | Orthopedic | Developmental Dysplasia of the Hip (DDH) | DDH | Open reduction with Femoral and Acetabular Osteotomy | 79.8 & 86.89 | ODDH05 | 15 | 60,000 |
| 16 | Orthopedic | Developmental Dysplasia of the Hip (DDH) | DDH | Femoral Osteotomy | 77.3 | ODDH06 | 16 | 30,000 |
| 17 | Orthopedic | Developmental Dysplasia of the Hip (DDH) | DDH | Acetabular Osteotomy | 77.35 | ODDH07 | 17 | 40,000 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 18 | Orthopedic | Developmental Dysplasia of the Hip (DDH) | DDH | Pelvic Support Osteotomy | 77.3 | ODDH08 | 18 | 40,000 |
| 19 | Ophthalmology | Congenital Cataract | Congenital Cataract | Paediatric Cataract Surgery (Phacoemulsification IOL) | 13.71.3 | OPCCC01 | 19 | 20,000 |
| 20 | Ophthalmology | Congenital Cataract | Congenital Cataract | Cataract surgery (Phacoemulsification) | 13.41 | OPCCC02 | 20 | 20,000 |
| 21 | Ophthalmology | Retinopathy of Prematurity | ROP | Photocoagulation for ROP | 14.25 | OPROP01 | 56 | 10,000 |
| 22 | Ophthalmology | Vision Impairment | Strabismus | Single muscle surgery | 15.2. | OPS01 | 103 | 8,500 |
| 23 | Ophthalmology | Vision Impairment | Strabismus | Two or three muscles surgery | 15.4 | OPS02 | 104 | 11,000 |
| 24 | ENT | Congenital Deafness | Congenital Deafness | Behind Ear Analogue Hearing Aid | 20.95 | ENTCD01 | 21 | 10,000 |
| 25 | ENT | Congenital Deafness | Congenital Deafness | Cochlear Implant Surgery for children below 2 years | 20.9 | ENTCD02 | 22 | 5,20,000 |
| 26 | ENT | Otitis Media | Acute and Chronic Suppurative Otitis Media (ASOM and CSOM) | Myringotomy with grommet for one ear | 20.01 | ENTOM01 | 57 | 10,000 |
| 27 | ENT | Otitis Media | Acute and Chronic Suppurative Otitis Media (ASOM and CSOM) | Myringotomy with grommet for both ears | 20.01 | ENTOM02 | 58 | 15,000 |
| 28 | ENT | Otitis Media | Acute and Chronic Suppurative Otitis Media (ASOM and CSOM) | Myringoplasty | 19.4 | ENTOM03 | 59 | 16,000 |
| 29 | ENT | Otitis Media | Chronic Suppurative Otitis Media (CSOM) | Myringoplasty with ossiculoplasty | 19.4 | ENTOM04 | 60 | 17,000 |
| 30 | ENT | Otitis Media | Chronic Suppurative Otitis Media (CSOM) | Tympanoplasty / Cortical mastoidectomy | 19.5 | ENTOM05 | 61 | 17,000 |
| 31 | ENT | Otitis Media | Chronic Suppurative Otitis Media (CSOM) | Radical / Modified radical Mastoidectomy | 20.4 | ENTOM06 | 62 | 18,000 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 32 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | Atrial Septal Defect (ASD) | ASD Device Closure | 35.51 | CCHD01 | 23 | 95,000 |
| 33 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | Atrial Septal Defect (ASD) | ASD Surgical Closure (Intracardiac repair) | 35.71 | CCHD02 | 24 | 85,000 |
| 34 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | AV Canal defect | AVSD / AV Canal Defect repair | 35.71 | CCHD03 | 25 | 1,60,000 |
| 35 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | Ventricular Septal Defect (VSD) | VSD Device Closure with PDA device | 35.53 | CCHD04 | 26 | 75,000 |
| 36 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | Ventricular Septal Defect (VSD) | VSD Device Closure with VSD device | 35.53 | CCHD05 | 27 | 95,000 |
| 37 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | Ventricular Septal Defect (VSD) | VSD Device Closure with VSD device in infants | 35.53 | CCHD06 | 28 | 1,25,000 |
| 38 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | Ventricular Septal Defect (VSD) | VSD Surgical Closure (Intracardiac repair) | 35.72 | CCHD07 | 29 | 90,000 |
| 39 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | Patent Ductus Arteriosus (PDA) | PDA Device Closure | 35.83.2 | CCHD08 | 30 | 75,000 |
| 40 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | Patent Ductus Arteriosus (PDA) | PDA coil closure: single coil | 35.83.3 | CCHD09 | 31 | 30,000 |
| 41 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | Patent Ductus Arteriosus (PDA) | PDA coil closure: multiple coil | 35.83.4 | CCHD10 | 32 | 40,000 |
| 42 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | Patent Ductus Arteriosus (PDA) | Surgical closure of PDA (PDA ligation) | 35.83 | CCHD11 | 33 | 45,000 |
| 43 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | Patent Ductus Arteriosus (PDA) | PDA stenting | 35.83.1 | CCHD12 | 34 | 80,000 |
| 44 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | Truncus Arteriosus | Truncus Arteriosus Surgery | 35.83 | CCHD13 | 35 | 1,50,000 |
| 45 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | TAPVC | Surgical correction of TAPVC | 35.82 | CCHD14 | 36 | 1,50,000 |
| 46 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | Tetrology of Fallot (TOF) | Total correction of TOF | 35.81 | CCHD15 | 37 | 1,50,000 |
| 47 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | Tetrology of Fallot (TOF) | Systemic Pulmonary Shunts with graft | 39 | CCHD16 | 38 | 60,000 |
| 48 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | Pulmonary Atresia / | Open pulmonary valvotomy | 35.13 | CCHD17 | 39 | 90,000 |
| 49 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | Pulmonary Stenosis | Balloon pulmonary valvotomy | 35.03 | CCHD18 | 40 | 40,000 |
| 50 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | Tricuspid Atresia / | Glenn procedure | 35.94 | CCHD19 | 41 | 1,00,000 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Tricuspid Stenosis and Ebstein's Anomaly | | | | | |
| 51 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | Tricuspid Atresia / Tricuspid Stenosis and Ebstein's Anomaly | Fontan procedure | 35.94 | CCHD20 | 42 | 1,70,000 |
| 52 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | Aortic valve Stenosis | Aortic valve replacement (with valve) | 35.23 | CCHD21 | 43 | 1,45,000 |
| 53 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | Aortic valve Stenosis | Aortic valve replacement (with Bioprosthetic valve) | 35.22.3 | CCHD22 | 44 | 1,60,000 |
| 54 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | Aortic valve Stenosis | Open aortic valvotomy | 35.11 | CCHD23 | 45 | 90,000 |
| 55 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | Aortic valve Stenosis | Ross procedure without conduits | 35.22.1 | CCHD24 | 46 | 1,20,000 |
| 56 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | Aortic valve Stenosis | Ross procedure with conduits | 35.22.1 | CCHD25 | 47 | 1,55,000 |
| 57 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | Aortic valve Stenosis | Balloon aortic valvotomy | 35.01 | CCHD26 | 48 | 40,000 |
| 58 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | Transposition of the great arteries (TGA) | TGA Arterial Switch | 35.84 | CCHD27 | 49 | 1,55,000 |
| 59 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | Transposition of the great arteries (TGA) | TGA Sennings Procedure | 35.91 | CCHD28 | 50 | 1,55,000 |
| 60 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | Transposition of the great arteries (TGA) | TGA Mustards Procedure | 35.91 | CCHD29 | 51 | 1,55,000 |
| 61 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | Coarctation of the aorta (COA) | Coarctation dilatation | 39.5 | CCHD30 | 52 | 40,000 |
| 62 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | Coarctation of the aorta (COA) | Coarctation dilatation with stent | 39.5 | CCHD31 | 53 | 80,000 |
| 63 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | Coarctation of the aorta (COA) | Coarctation aorta repair with graft | 39.5 | CCHD32 | 54 | 1,00,000 |
| 64 | Cardiovascular surgery | Congenital Heart Disease (CHD)* | Coarctation of the aorta (COA) | Coarctation aorta repair without graft | 39.5 | CCHD33 | 55 | 70,000 |
| 65 | Cardiovascular surgery | Rheumatic Heart Disease* | Mitral valve Stenosis | Closed mitral valvotomy | 35.02 | CRHD01 | 63 | 40,000 |
| 66 | Cardiovascular surgery | Rheumatic Heart Disease* | Mitral valve Stenosis | Open mitral valvotomy | 35.12 | CRHD02 | 64 | 1,10,000 |
| 67 | Cardiovascular surgery | Rheumatic Heart Disease* | Mitral valve Stenosis | Balloon Mitral valvotomy | 35.02 | CRHD03 | 65 | 30,000 |
| 68 | Cardiovascular surgery | Rheumatic Heart Disease* | Mitral valve Stenosis | Mitral valve replacement (with | 35.23 | CRHD04 | 66 | 1,45,000 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | valve) | | | | |
| 69 | Cardiovascular surgery | Rheumatic Heart Disease* | Mitral valve Stenosis | Mitral valve replacement (Bioprosthetic valve) | 35.24 | CRHD05 | 67 | 1,60,000 |
| 70 | Cardiovascular surgery | Rheumatic Heart Disease* | Mitral valve Stenosis | Mitral valve repair (without Prosthetic ring) | 35.24 | CRHD06 | 68 | 1,10,000 |
| 71 | Cardiovascular surgery | Rheumatic Heart Disease* | Mitral valve Stenosis | Mitral valve repair (with Prosthetic ring) | 35.24 | CRHD07 | 69 | 1,40,000 |
| 72 | Cardiovascular surgery | Rheumatic Heart Disease* | Mitral valve Stenosis | Double valve replacement (with valve) | 35.20.2 | CRHD08 | 70 | 1,80,000 |
| 73 | Cardiovascular surgery | Rheumatic Heart Disease* | Mitral valve Stenosis | Double valve replacement (Bioprosthetic valve) | 35.20.3 | CRHD09 | 71 | 2,00,000 |
| 74 | Dental | Dental Caries | Dental Caries | Extraction of Tooth | 23.01 | DDC01 | 72 | 200 |
| 75 | Dental | Dental Caries | Dental Caries | Application of Pit & Fissure Sealants (Pedo Full mouth) | 23.2.1 | DDC02 | 73 | 300 |
| 76 | Dental | Dental Caries | Dental Caries | Amalgam Restoration Per Tooth | 23.2.2 | DDC03 | 74 | 150 |
| 77 | Dental | Dental Caries | Dental Caries | Temporary Filling Per Tooth | 23.2.3 | DDC04 | 75 | 100 |
| 78 | Dental | Dental Caries | Dental Caries | Tooth Coloured Restoration Per Tooth (GIC) | 23.2.4 | DDC05 | 76 | 200 |
| 79 | Dental | Dental Caries | Dental Caries | Tooth Coloured Restoration Per Tooth (Composite) | 23.2.4 | DDC06 | 77 | 250 |
| 80 | Dental | Dental Caries | Dental Caries | Flouride Varnish Application (Pedo Full mouth) | 23.4.1 | DDC07 | 78 | 150 |
| 81 | Dental | Dental Caries | Dental Caries | Atraumatic Restorative Treatment | 23.4.6 | DDC08 | 79 | 200 |
| 82 | Dental | Dental Caries | Dental Caries | Pulpectomy With Ssc (Stainless Steel Crown ) | 23.4.7 | DDC09 | 80 | 700 |
| 83 | Dental | Dental Caries | Dental Caries | Root Canal Treatment – Deciduous Tooth | 23.7.1 | DDC10 | 81 | 500 |
| 84 | Dental | Dental caries | Dental caries | Anterior Root Canal Treatment | 23.7.2 | DDC11 | 82 | 1,200 |
| 85 | Dental | Dental caries | Dental caries | Apicocetomy | 23.7.3 | DDC12 | 83 | 2,000 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 86 | Dental | Dental caries | Dental caries | Posterior Root Canal Treatment with Permanent Restoration | 23.7.5 | DDC13 | 84 | 1,800 |
| 87 | Dental | Dental caries | Dental caries | Extraction Of III Molar / Impacted Tooth under L.A | 23.19.1 | DDC14 | 85 | 2,000 |
| 88 | Dental | Dental caries | Dental caries | Surgical Extraction of Tooth | 23.19.2 | DDC15 | 86 | 1,000 |
| 89 | Dental | Dental caries | Dental caries | Fabrication & Cementation of Metal Ceramic Crown per unit | 23.41.2 | DDC16 | 87 | 800 |
| 90 | Dental | Dental caries | Dental caries | Placement of Stainless Steel crown per Tooth | 23.41.4 | DDC17 | 88 | 500 |
| 91 | Dental | Dental caries | Dental caries | Metal Post & Core Restoration with Metal Ceramic Crown (Anterior) | 23.41.7 | DDC18 | 89 | 2,290 |
| 92 | Dental | Dental caries | Dental caries | Treatment with Expansion Plate | 23.42.2 | DDC19 | 90 | 1,500 |
| 93 | Dental | Dental caries | Dental caries | Fabrication & Insertion of Removable Appliance (Upper/ Lower ) | 23.43.2 | DDC20 | 91 | 1,200 |
| 94 | Dental | Dental caries | Dental caries | Fabrication & Insertion of Removable Partial Denture - Single Tooth (Anterior) | 23.43.4 | DDC21 | 92 | 550 (+ 50 per tooth) |
| 95 | Dental | Dental caries | Dental caries | Fabrication & Insertion of Fixed Space Maintainers / Space Retainer | 23.43.6 | DDC22 | 93 | 1,280 |
| 96 | Dental | Dental caries | Dental caries | Fabrication & Insertion of Removable Space Maintainers (Pedo) | 23.43.7 | DDC23 | 94 | 1,000 |
| 97 | Dental | Dental caries | Dental caries | Fixed Orthodontics Treatment-Metal Braces for Cleft palate only | 24.7.5 | DDC24 | 95 | 10,680 |
| 98 | Dental | Dental caries | Dental caries | Fabrication & Insertion of Feeding Plate (Acrylic) | 24.7.8 | DDC25 | 96 | 1,200 |
| 99 | Dental | Dental caries | Dental caries | Fabrication & Insertion of | 24.7.9 | DDC26 | 97 | 1,200 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Obturator -Acrylic | | | | |
| 100 | Dental | Dental caries | Dental caries | Fabrication & Insertion of Obturator & Speech Bulb-Acrylic | **24.7.10** | DDC27 | **98** | 1,500 |
| 101 | Dental | Dental caries | Dental caries | Incision & Drainage of Simple Abscess (per Tooth) | **27.1** | DDC28 | **99** | 500 |
| 102 | Dental | Dental caries | Dental caries | Incision & Drainage of Facial Abscess Under LA | **27.3** | DDC29 | **100** | 2,500 |
| 103 | Dental | Dental caries | Dental caries | Oral Prophylaxis - calculi (Upper/ Lower) | **96.54.2** | DDC30 | **101** | 250 |
| 104 | Dental | Dental caries | Dental caries | Dental IOPA X ray | | DDC31 | **102** | 50 |